**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
PHONE - EPABS-0091-0231-2609000 FAX NO. -0091-0231-2691533 & 0091-0231 2692333
**शिवाजीविद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र**
**University WEBSITE : www.unishivaji.ac.in**

**Estd : 1962**
**"A++" Accredited by**
**NAAC (2021) with CGPA 3.52**

**Prof. Dr. R. V. Gurav**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भक्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/621 दि. 26/11/2021

प्रति,

मा. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था, व
मा. विभागप्रमुख, पदव्युत्तर अधिविभाग, कोल्हापूर.

**विषय :– जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव 2021–2022.**

महोदय/महोदया,

शिवाजी विद्यापीठाचा 41 वा युवा महोत्सव 2021–2022 द्विस्तरीय पध्दतीने आयोजित केला जाणार आहे. **जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव खाली नमूद केल्याप्रमाणे आयोजित करणेत येतील.**

| अ.नं. | जिल्हा | यजमान महाविद्यालय | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | सातारा | छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | 20 डिसेंबर, 2021 |
| 2 | सांगली | डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली | 22 डिसेंबर, 2021 |
| 3. | कोल्हापूर | न्यू कॉलेज, कोल्हापूर | 24 डिसेंबर, 2021 |
| 4. | मध्यवर्ती | संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, महागांव ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर | 27, 28 व 29 डिसेंबर, 2021 |

**तरी वरीलप्रमाणे जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाबाबत नोंद घ्यावी व आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा संघ बनवून युवा महोत्सवामध्ये सहभागी व्हावे ही विनंती.**

सुचनाः–

1. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठीच्या प्रवेशिका या पत्रासोबत **(Excel Sheet)** पाठविणेत आलेल्या असून त्या व्यवस्थित भरुन विद्यार्थी विकास विभागाचे dsw@unishivaji.ac.in या ईमेलवरती आपले महाविद्यालयास विद्यापीठाकडून देणेत आलेल्या unishivaji.ac.in ईमेलवरुनच **दि. 10/12/2021** रोजी रात्री 12.00 वाजेपर्यंत पाठविणेत याव्यात. यानंतर आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही.
2. महाविद्यालयांनी सहभागी होणा–या कलाप्रकारांसाठी प्रवेशिका एकदाच भरुन पाठवावयाच्या आहेत. पुनःश्च आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही.
3. महाविद्यालयांनी सहभागी सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे शुल्क विद्यापीठाचे बॅक खातेवर चलन/ऑनलाईन/रोखीने भरुन त्यांचे मुळ चलन/रिसीट या विभागाकडे पाठविणेत यावे.
4. सदरच्या प्रवेशिका मा. प्राचार्य व संघप्रमुख यांचे सहीने या कार्यालयास हार्ड कॉपी व सहभागाचे शुल्काचे मुळ चलनासह पाठवाव्यात.
5. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाचे वेळापत्रक सर्व महाविद्यालयांना यथावकाश ई–मेलद्वारे पाठविणेत येईल.
6. जास्तीत–जास्त विद्यार्थ्यांना युवा महोत्सवात सहभागी होता यावे यासाठी महाविद्यालयांनी त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक दि. 20 ते 29 डिसेंबर, 2021 हा कालावधीत वगळून निश्चित करावे.
7. युवा महोत्सवात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांनी कोव्हीड–19 च्या अनुषंगाने शासन निर्देशाचे पालन करुन सहभागी व्हावे.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

सोबतः युवा महोत्सव नियमावली पुस्तिका